# Summary of Report

# Of

# Minor Research Project

# 2008 - 2010

**Entitile:-**

**Tradition of Various Folk Songs in Akot Taluka : A Survey**

**Submitted By**


KU. P. C. PAVITRAKAR
(Principle Investigator)

**DEPARTMENT OF MUSIC**

**SHRI. SHIVAJI ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, AKOT**
**Tq. AKOT DIST AKOLA (M.S.)**



**UNIVERSITY GRAND COMMISSION (WRO) PUNE**

# सारांश

लोकसंगीत हे लोकांच्या मनातील भाव व त्यातुन निघालेले तरंगापासून निर्माण होतय. कुठलीही रचना करतांना व्यक्ती विशेष हे माध्यम असतं परंतू जेव्हा रचनेचे रचनाकार किंवा गायकाचे नाव महत्वपूर्ण नसून काम महत्वपूर्ण असतं. तेव्हा ती रचना म्हणजे लोकसंगीत होय.

अशा प्रकारे लोक संगीताचा जन्म लोक मानसातुन झालेला आहे. मनुष्य जन्माच्या इतिहासाप्रमाणेच लोक मानसाचा इतिहास प्राचीन आहे. म्हणजेच लोकसंगीताचा जन्म मनुष्य जन्माप्रमाणे प्राचीन आहे.

लोक संगीताच्या 3 मुख्य विशेषता

1) लोक निर्मित असावं

2) लोक प्रचलित असावं

3) लोक विषयक असावं

अशा प्रकारे लोकसंगीताचा जन्म लोकजन्माशी निगडीत आहे. यातील ध्वनि स्वर, लय, आणि गायकी मध्ये लोकहृदयातील संवेदना सुखदुःख, हर्षोल्हास, प्रसन्नता, एवढेच नाही तर लोक हृदयातील धडधड त्याची स्पंदन त्यात प्रकट होतात हे संगीत लोकांशी जोडले असल्यामुळे अस म्हणतात कि हे शास्त्रीय संगीताहुन प्राचीन आहे.

लोक संगीत दोन शब्दांनी बनलेले आहे. 'लोक आणि संगीत' याचा अर्थ लोकांचे संगीत महात्मा गांधींनी म्हटले आहे कि ''लोकसंगीत मध्ये सर्व जगच गात आणि नृत्य करतं.''

लोकसंगीत आणि शास्त्रीय संगीताचा घनिष्ट संबंध आहे. संगीतातील हे दोन्ही पक्ष अनादी काळापासुन सोबत चालत आले आहेत. शास्त्रीय संगीतात गायक वा वादक हा एकटया रुपात केंद्रस्थानी असतो. तो गातो आणि श्रोतसमाज ऐकतो. लोकगीत हे सर्वजन मिळून म्हणतात नव्हे गातात म्हणुन लोकगीत आणि लोकसंगीत यांचा संबंध अतुट आहे. लोकसंगीताला एखादया

झऱ्याची उपमा देता येईल जो पहाडातुन उगम पाऊन स्वच्छा होत–होत पुढे जातो. शास्त्रीय संगीत या जलधारेचं नाव आहे. जे नियम आणि बंधनांमध्ये सिमित राहुन योग्य मार्ग आणि दिशेने सुव्यवस्थित रुपात प्रवाहीत होतं एकाच नदीच्या दोन धारां सारखे शास्त्रीय  संगीताची विशेषता म्हणजे राग नियम रागाला दुसऱ्या शब्दात विशिष्ट भावनांचे स्वरचित्र पण म्हणतात. काही राग तर असे आहेत ज्यांचे मुळ रुप लोक धुन होते त्यांचंच विश्लेषणात्मक रुप म्हणजे काही रागांची निर्मीती जसे सारंग, भूपाली, देस, काफी इ. लोकगीतांचे काही प्रकार शास्त्रीय संगीताच्या अगदी जवळचे आहेत. जसे बनारस ची कजरी किंवा चैती.

संगीतामुळे मानवी मन अगदि मधुरतेने अभिव्यक्त होतं प्रत्येक प्राणी आपल्या अनुभुतींना कुठल्यातरी रुपात अभिव्यक्त करीत असतो. संगीतातील भावपूर्ण रचना सहजच मनाला आकर्षित करते. यामुळैच जेव्हा भावप्रधान संगीत अपल्या कानावर पडतं. तेव्हा शास्त्रीय संगीताचे तसुभरही ज्ञान नसलेला साधारण व्यक्ती पण रसविभोर होवुन जातो. म्हणुनच असं म्हटल्या जाते. कि लोकसंगीत केवळ मनोरंजनाचे साधन आहे पण त्यातील गीतांद्वारे सामाजिक स्थिती, रीतिरिवाज, सभ्यता, संस्कृती ची झलक आपल्याला पहायला मिळते. अशा प्रकारे लोकसंगीत ज्ञानवर्धनामध्ये सुध्दा सहाय्यक ठरतं.

लोकगीताची कवी कोण आणि त्याला चाल लावणारा कोण हे नेमकेपणाने सांगता येत नाही. कुणीतरी गीताची रचना करतो, मग तो स्वतः किंवा दुसरा कुणीतरी त्याला चाल लावतो, मग ते गाणे आणि ती चाल समाजात चालू होते आणि वर्षानुवर्षे तशीच चालत राहते. पुढे यात काही जोडण्या व बदल होतात तेही मौखीक स्वरुपात होतात. डॉ. रानडे यांनी या संदर्भात मौखिक च्या ऐवजी ‘अलिखित’ असा शब्द सुचवला आहे आणि तो सुयोग्यच आहे. कारण लोकगीत हे जनतेच्या पाठांतरातून चालत आलेले असते. ते लिहीलेले नतसे आणि त्याची स्वरलिपी किंवा त्याचे स्वरलेखन ही झालेले नसते.

लोकगीत आणि त्याचे संगीत यांचा उपयोग धार्मिक संस्कार व विधिविधान, पुजाअर्चा, उत्सव, सण, दळण–कांडण, लग्न, डोहाळ जेवण, मृत्यसमयीची गाणी अशा सर्व घटनांमध्ये गीत, श्लोक, वगैरे प्रकार चालीवर किंवा गळयावर म्हणणे एवढयापुरताच सूर आणि लय यांचा संबंध असतो. लोकगीते ही प्रथा ग्रामीण स्त्रीसमाजात गटातून गायीली जातात. उदा. मंगळागौरीची गाणी, पाळणे, भोंडला गीते वगैरे या समूहिकतेमुळे काटेकोर सुरेलपणाही संभाळला जाऊ शकत नाही. एक विशिष्ट लय मात्र पाळली जाते. टाळयांचा उपयोग कल वाद्यांसारखा करुन त्यात आणखी भर पडते ती चिमटा, झांज, चिपळया, तसेच ढोल ताशा, ढोलक, डफ, तुनतुने, संबळ इ. वाद्यांची.

लोकगीतांचे जे विषय असतात ते मानव समाजाच्या दैनंदिन जीवनातील लहानमोठया घटनांवर आधारलेले असतात. या अनेक विध विषयांमध्ये भाऊ–बहीण, सासू – ननंद, सासर–माहेर, पति विरहाची वेदना आणि संयोग शृंगारातील रोमांचकता या विषयांनाही खूप प्राधान्य मिळालेले असते. यातील खूपसे विषय हे राग संगीतातील चिजांसाठी उपयोजीले गेले आहेत.

लोकसंगीत अनेक रुपांमध्ये प्रचलित होवु लागते याला ग्रामीण व शहरी दोन्ही भागांमध्ये महत्व प्राप्त झाले आहे. परंतु वेगवेगळया नाव व रुप धारण केले आहे. जसे मिर्जापुर मे कजरी, मारवाड मध्ये मांड, पूर्वी उत्तर मध्ये विदेसिया, बिहुला इ. बरेच प्रचारात आहे.

स्त्री पुरुषांनी वेगवेगळया सण, उत्सवाच्या तसेच धार्मिक विधी संदर्भात विपुल अशी गाणी म्हटली आहेत. धर्मासंबंधी उत्सव प्रसंगी सण, समारंभाच्या वेळी, संस्कार संबंधी, दैनंदिन घरतील कामे करतांना, कृषीकार्यकरताना इ. प्रसंगी स्त्रीयांनी गीते गायीली आहेत. स्त्री गीतांनी समाजातील स्त्रीयांचे स्थान, मान सन्मान त्यांचे महत्व तसेच त्यांची होणारी मानसिक अवहेलना गीतांमधून चित्रीत केली आहे. यांच्या सोबतच पुरुषांनी सुध्दा लोकगीताची निर्मिती केली आहे. लोकजीवनातील सामुहिक इच्छा, भावना, मन, ह्दय यांबाबतच्या लोक धारणा लोकगीतांमधून व्यक्त

झाल्या आहेत. पुरुष वर्गाने धार्मिक प्रसंगी, कृषीकार्यकरतांना तसेच विधी प्रसंगी गाणी म्हटली आहे. मनाला मोकळे वाटावे, श्रमातून विरंगुळा मिळावा तसेच थोडयावेळापुरते मनोरंजन व्हावे याकरिता गीते म्हटली आहेत. आकोट तालुक्यातील धारगडच्या महादेवाला जातांना गाणी गायिली आहेत. अशाप्रकारे पुरुषांनी गायीलेल्या लोकगीतांमधून लोकांच्या समूहमनाचे प्रतिबींब प्रकट झाले आहे.

आजच्या या पाश्चात्य संगीताच्या युगात लोकसंगीत लुप्त होताना दिसते आहे. पण आजही काही कलाकार असे आहेत. कि, त्यांनी आपल्या या लोक संस्कृतीला टिकवुन जतन करुन ठेवले आहे.

लोकसंगीतात उपयुक्त होणारे वादय –

घुघरु, घटियाल, घंटी, घडा, खंजीरा, खोल, काष्ठ तरंग, करनाल, ताशा,

## <u>संदर्भ सूची</u>


1) डॉ. शंकर राऊत संपा 'लोकसाहित्याचे अंतप्रवाह' स्मरणिका

2) डॉ. द. ता. भोसले 'लोकसंस्कृती' स्वरुप आणि विशेष

3) डॉ. प्रभाकर मांडे 'लोकरंगभूमी' गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद

4) डॉ. शरद व्यवहारे 'मराठी स्त्रीगीते' प्रतिभा प्रकाशन, पुणे 30

5) डॉ. प्रतिभा इंगोले 'लोकसंस्कृती आणि स्त्री जीवन' दिलीपराज प्रकाशन पुणे

6) डॉ. प्रतिभा इंगोले 'झेंडवाईचे दिवे'

7) डॉ. मधुकर वाकोडे 'लोक घाटीच्या वहिवाटी'

8) डॉ. सौ. शैलजा दवेगावकर 'महाराष्ट्रातील आदिवासीचे लोकसाहित्य

9) श्री. अशोक रानडे 'लोकसंगीत शास्त्र'

10) सरोजीनी बाबर 'लोकसाहित्य आणि संस्कृती'

11) सं. कार्यालय हाथरस संगीत कला विहार विशेषांक

12) ले. प्रभुलल गर्ग भारतीय लोकसंगीत

13) प्रा. विठ्ठल कोळी महाराष्ट्रातील लोकगीते

14) सरोजीनी बाबर 'भोंडला भुलाबाई'